**2. Policy documents and top views of medal**

https://www.sgbau.ac.in/pages/Awards/Gaurav%202021Letter%20with%20enclosure.pdf

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**नियम क्र. ९ /२०१२**

**विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा गौरव व सत्कार करण्याबाबातचे (दुरूस्ती) नियम,२०१२**

ज्याअर्थी, 'विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा गौरव व सत्कार करण्याबाबातचे नियम' म्हणजे मुळ नियम क्र. ३/२०१० मध्ये सुधारणा करण्याचे ठरले आहे. त्याअर्थी व्यवस्थापन परीषद खालीलप्रमाणे नियम तयार करण्यास अनुकुल आहे.

हे नियम " विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा गौरव व सत्कार करण्याबाबतचे (दुरूस्ती) नियम २०१२" म्हणून संबोधण्यात येईल.

२ हे नियम व्यवस्थापन परिषदेने मान्य केल्याचे दिनांकापासून अस्तित्वात येतील.

मुळ नियमाच्या म्हणजे, नियम क्र. ३/२०१० च्या (यापुढे जेथे-जेथे मुळ नियमाचा उल्लेख करावयाचा असेल तेथे-तेथे 'मुळ नियम'म्हणुन उल्लेख करण्यात येईल) परिच्छेद ३) च्या व्याख्येअंतर्गत अ) मधील दुसऱ्या व तिसऱ्या ओळीत निदर्शनास येणाऱ्या 'महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४, परिनियम, अध्यादेश व महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता १९८४' या वाक्यातील 'महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता १९८४ केलेले आदेश' हे शब्द व संख्या वगळुन त्याऐवजी 'शासनाद्वारे अकृषी विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालयाकरीता निर्गमीत केलेले आदेश' असे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

मुळ नियमाच्या परिच्छेद ५) च्या पुरस्काराच्या वर्गवारी मधील अ) विद्यापीठ स्तर या शिर्षकांतर्गत '(अ) शिक्षक - एक' या उप-तरतुदी नंतर निदर्शनास येणारी उप-तरतुद '(ब) अधिकारी (प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणी) - एक' ऐवजी '(ब) प्रथम श्रेणी अधिकारी - एक' आणि '(क) द्वितीय श्रेणी अधिकारी - एक' या उपतरतुदींचा समावेश करून त्यापुढील उपतरतुदी '(क) तृतीय श्रेणी कर्मचारी - एक', '(ड) चतुर्थ श्रेणी कर्मचारी - एक' या उप-तरतुदींची कंसातील मुळाक्षरे अनुक्रमे '(ड)' व '(इ)' अशी बदलविण्यात येतील.

मुळ नियमाच्या परिच्छेद ९) च्या 'गौरवा निमित्त पारितोषिक/प्रशस्तीपत्र प्राप्त करणाऱ्या व्यक्तीस खालील अधिकारी पुरस्कारक राहतील. या शिर्षकांतर्गत निदर्शनास येणाऱ्या उप-तरतुद क) मधील 'अधिकारी' या शब्दापुढे '(प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणी)' या कंसातील शब्दांचा समावेश करण्यात येईल.

मुळ नियमाच्या परिच्छेद ११) अंतर्गत उप-तरतुद 'अ)' मधील शेवटच्या ओळीतील 'यासाठी विद्यापीठाकडून वेगळी अधिसूचना किंवा परिपत्रक काढण्यात येणार नाही.' ह्या वाक्याऐवजी 'विद्यापीठाच्या स्तरावर कार्यालयीन सूचना निर्गमीत करण्यात यावी व महाविद्यालयांकरिता वृत्तपत्रांमध्ये बातमी प्रसिध्द करावी.' हे वाक्य समाविष्ट करण्यात येईल. त्याचप्रमाणे संबंधीत परिच्छेदाच्याच उप-तरतुद क) मधील तिसऱ्या ओळीतील 'एक प्राचार्य / शिक्षक / अधिकारी / कर्मचारी (तृतीय श्रेणी मधून एक व चतुर्थ श्रेणी मधून एक)' ह्या वाक्याऐवजी 'एक प्राचार्य / शिक्षक / अधिकारी वर्ग-१ व वर्ग-२ / कर्मचारी (तृतीय श्रेणी मधून एक व चतुर्थ श्रेणी मधून एक)' या वाक्याचा समावेश करण्यात येईल.

मुळ नियमाच्या परिच्छेद १३) अंतर्गत निदर्शनास येणाऱ्या 'सदर उपक्रमाकरीता अपेक्षित खर्चाची तरतूद दरवर्षी अंदाजपत्रकात करण्यात येईल.' ह्या तरतुदी ऐवजी 'सदर उपक्रमाकरीता पदकेतयार करण्याची तसेच दरवर्षी अंदाजपत्रकात तरतुद करण्याची कार्यवाही वित्त विभागामार्फत करण्यात येईल.' ह्या तरतुदीचा समावेश करण्यात येईल.

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

नियम क्र. ३ /२०१०

**विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा गौरव व सत्कार करण्याबाबातचे नियम**

ज्याअर्थी, व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यापीठाला दिलेल्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांचा गौरव करावयाचा निर्णय घेतलेला आहे.

त्याअर्थी उपरोक्त प्रयोजनार्थ नियम तयार करण्यात येत आहे.

१) हे नियम " विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा गौरव व सत्कार करण्याबाबतचे नियम - ३/२०१०" म्हणून संबोधण्यात येईल.

२) हे नियम व्यवस्थापन परिषदेने मान्य केल्याचे दिनांकापासून अस्तित्वात येतील.

३) **व्याख्या -**

**अ)** या नियमातील " विद्यापीठ, महाविद्यालयाचे प्राचार्य, विभाग प्रमुख, विद्यापीठ शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी, संलग्न महाविद्यालय, स्वायत्त महाविद्यालय, मान्यता प्राप्त संस्था " म्हणजे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४, परिनियम,अध्यादेश व महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता १९८४ यामध्ये नमुद केलेल्या परिभाषा.

**ब)** " समिती "म्हणजे सदर नियमांतर्गत द्यावयाच्या पुरस्कारासाठी पात्र असलेल्यांची निवड करण्याकरीता व्यवस्थापन परिषदेद्वारा मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती.

**क)** "गौरव" म्हणजे विद्यापीठ / संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सदर नियमांतर्गत द्यावयाचा पुरस्कार

४) **सदर प्रयोजनार्थ मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती खालीलप्रमाणे असेल.**

| | | |
|---|---|---|
| १) मा. कुलगुरू | .... | अध्यक्ष |
| २) व्यवस्थापन परिषदेने नामित केलेले व्य. प. चे दोन सदस्य | .... | सदस्य |
| ३) कुलसचिव | .... | सचिव |

५) **पुरस्काराची वर्गवारी खालीलप्रमाणे राहील.**

**अ) विद्यापीठ स्तर -**

| | | |
|---|---|---|
| (अ) शिक्षक | - | एक |
| (ब) अधिकारी (प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणी) | - | एक |
| (क) तृतीय श्रेणी कर्मचारी | - | एक |
| (ड) चतुर्थ श्रेणी कर्मचारी | - | एक |

**ब) संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था स्तर**

| | | |
|---|---|---|
| (अ) संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक | - | एक |
| (ब) संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक | - | एक |
| (क) संलग्न महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी | - | एक |

६) **गौरव पुरस्काराचे स्वरूप पुढीलप्रमाणे राहील.**

(अ) प्रमाणपत्र ( परिशिष्ट - ड )

(ब) शाल व श्रीफळ

(क) १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पदक, ज्यावर एका बाजूने विद्यापीठाचे मोनोग्राम व दुस-या बाजूने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ वर्धापन दिन - गौरवप्राप्त प्राचार्य /शिक्षक / अधिकारी / कर्मचारी यांचे नाव, १ मे —— असे नमूद केलेले असेल. (परिशिष्ट - इ )

**विनियम क्र. ३/२०१८**

**विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य /संचालक / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार आणि संलग्नित महाविद्यालय/स्वायत्त संस्था यांना नाविन्यपुर्ण उपक्रमाबद्दल गौरव पुरस्कार प्रदान करण्याबाबतचे विनियम, २०१८**

ज्याअर्थी, व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य /संचालक/ शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यापीठाला दिलेल्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल तसेच संलग्नित महाविद्यालय/स्वायत्त संस्था यांना नाविन्यपुर्ण उपक्रमाबद्दल गौरव करावयाचा निर्णय घेतलेला आहे.

त्याअर्थी उपरोक्त प्रयोजनार्थ विनियम तयार करण्यात येत आहे.

१) हे विनियम "विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य /संचालक/ शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार आणि संलग्नित महाविद्यालय/स्वायत्त संस्था यांना नाविन्यपुर्ण उपक्रमाबद्दल गौरव पुरस्कार प्रदान करण्याबाबतचे विनियम क्र. ३/२०१८" असे संबोधण्यात येईल.

२) हे विनियम सन २०१९ पासून अस्तित्वात येतील.

३) **व्याख्या** -

**अ)** या विनियमातील " विद्यापीठ, महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक, विभाग प्रमुख, शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी, संलग्न महाविद्यालय, स्वायत्त महाविद्यालय, मान्यता प्राप्त संस्था " म्हणजे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, परिनियम, अध्यादेश व शासनाद्वारे अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांकरीता निर्गमित केलेले आदेश, यामध्ये नमुद केलेल्या परिभाषा.

**ब)** "समिती"म्हणजे सदर नियमांतर्गत द्यावयाच्या पुरस्कारासाठी पात्र असलेल्यांची निवड करण्याकरीता व्यवस्थापन परिषदेद्वारा मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती.

**क)** "गौरव" म्हणजे विद्यापीठ / संलग्नित महाविद्यालयातील प्रायार्य /संचालक/ शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सदर नियमांतर्गत द्यावयाचा पुरस्कार

४) **सदर प्रयोजनार्थ मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती खालीलप्रमाणे असेल.**

| | | |
|---|---|---|
| १) मा. कुलगुरू | .... | अध्यक्ष |
| २) व्यवस्थापन परिषदेने नामित केलेले व्य. प. चे दोन सदस्य | .... | सदस्य |
| ३) मा.कुलगुरु नामित शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय योगदान असलेली व्यक्ती | .... | सदस्य |
| ४) कुलसचिव | .... | सचिव |

५) **पुरस्काराची वर्गवारी खालीलप्रमाणे राहील.**

**अ) विद्यापीठ स्तर –**

| | | |
|---|---|---|
| (अ) शिक्षक | - | एक |
| (ब) प्रथम श्रेणी अधिकारी | - | एक |
| (क) द्वितीय श्रेणी अधिकारी | - | एक |
| (ड) तृतीय श्रेणी कर्मचारी | - | एक |
| (इ) चतुर्थ श्रेणी कर्मचारी | - | एक |

**ब) संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था स्तर**

| | | |
|---|---|---|
| (अ) संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक | - | एक |
| (ब) संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक | - | एक |
| (क) संलग्न महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी | - | एक |

परिशिष्ट "ड"

संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ

**उत्कृष्ट सेवा गौरव**

---

डॉ./श्री./श्रीमती ------------------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------

आपण आपल्या आजपर्यंतच्या सेवाकाळात विद्यापीठाला उल्लेखनीय सेवा दिली. आपण दिलेल्या उत्कृष्ट सेवा विद्यापीठाच्या विकासात व प्रतिष्ठेत भर घालणा-या आहेत. आपल्या या प्रशंसनीय सेवेबद्दल हे गौरव प्रमाणपत्र आपणास प्रदान करण्यात येत आहे.

दि.१ मे २०                                        कुलगुरू

परिशिष्ट " इ "

पदकाचा नमुना

एक बाजु

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ वर्धापन दिन

उत्कृष्ट सेवा

गौरव प्राप्त --------------- *

१ मे, २०१

दुसरी बाजु

* -- अधिकारी
* -- प्राचार्य
* -- शिक्षक
* -- शिक्षकेतर कर्मचारी

संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ

**उत्कृष्ट सेवा गौरव**

**प्रमाणपत्र**

**डॉ.संदीप आनंदराव वाघुले,**
**सहाय्यक प्राध्यापक, भौतिकशास्त्र विभाग,**
**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

आपण आपल्या आजपर्यंतच्या सेवाकाळात विद्यापीठाला उल्लेखनीय सेवा दिली. आपण दिलेल्या उत्कृष्ट सेवा विद्यापीठाच्या विकासात व प्रतिष्ठेत भर घालणाऱ्या आहेत. आपल्या या प्रशंसनीय सेवेबद्दल हे गौरव प्रमाणपत्र आपणास प्रदान करण्यात येत आहे.

दि.१ मे २०१७                                        कुलगुरू





२०१९

दिनांक    मे, २०१९
अधिसूचना

क्र.    / २०१९    दिनांक :    मे, २०१९

**विषय :- सन २०१९ मध्ये विद्यापीठातर्फे देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्राप्त प्राचार्य/ शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नाव जाहीर करणे**

सर्व संबंधितांच्या माहितीकरीता अधिसूचीत करण्यात येते की, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विनियम क्र. ३/२०१८ नुसार खालील नमूद केलेल्या शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना त्यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ठ सेवेबद्दल व योगदानाबद्दल दि. ४ मे, २०१९ रोजी उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत.

अ) **विद्यापीठ स्तर** -

| | | |
|---|---|---|
| (अ) | **शिक्षक** | :- **श्री.सुहास ज्ञानदेव पाचपांडे**, सहा.प्राध्यापक, पद्.संगणकशास्त्र विभाग |
| (ब) | **प्रथम श्रेणी अधिकारी** | :- **श्री मंगेश केशवराव वरखेडे**, उपकुलसचिव(विकास) |
| (क) | **द्वितीय श्रेणी अधिकारी** | :- **श्री निदान महादेवराव बारस्कर**, अधीक्षक, गोपनीय विभाग |
| (ड) | **तृतीय श्रेणी कर्मचारी** | :- **श्री मोहन निरंजनराव इंगळे**, कनिष्ठ सहाय्यक, विद्या विभाग |
| (इ) | **चतुर्थ श्रेणी कर्मचारी** | :- **श्री शंकर भैय्यालाल भगतपुरे**, सफाईगार, सामान्य प्रशासन विभाग |

ब) **संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था स्तर**-

| | | |
|---|---|---|
| (अ) | **संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य / संचालक** | :- **डॉ. अनिल विश्वनाथ चांदेवार**, प्राचार्य, पटलधमल वाधवाणी फार्मसी महाविद्यालय, यवतमाळ |
| (ब) | **संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक** | :- **डॉ.मिलिंद विष्णुपंत शिरभाते**, सहा.प्राध्यापक, शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अकोला. |
| (क) | **संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी** | :- **श्री डिगांबर रामराव धुमाळे**, अधीक्षक,स्व.भाष्करराव शिंगणे कला, प्रा.नारायणराव गावंडे विज्ञान व आशातला गावंडे वाणिज्य महाविद्यालय, साखरखेर्डा, जि.बुलढाणा |

**नाविन्यपुर्ण उपक्रम (रोख पुरस्कार रूपये ५००१/- व प्रशस्तिपत्र)** :- प्रा.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा - अमरावती

स्वा/-
(दि.स.राऊत)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

---

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**आस्थापना विभाग**
क्र. संगाबाअवि/१/१०२/ई-१९(के)/१-२१९ /२०१९
दिनांक : ०3 मे, २०१९

**प्रत :**

उपकुलसचिव (विद्या), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सदर अधिसूचना विद्यापीठ राजपत्र भाग-२ प्रसिद्ध करण्याचे कार्यवाहीस्तव अग्रेषित.

सहपत्र : मान्य प्रारूपाची प्रत.

उपकुलसचिव (आस्था.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

2\Data2\2019\SMT\Gaurav_Puraskar_19.pmd(19)

२०१८

दिनांक मे, २०१८
अधिसूचना

क्र. / २०१८ दिनांक : मे, २०१८

**विषय :- सन २०१८ मध्ये विद्यापीठातर्फे देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्राप्त प्राचार्य/ शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नाव जाहीर करणे**

सर्व संबंधितांच्या माहितीकरीता अधिसूचीत करण्यात येते की, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये सूरू करण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत मुळ नियम क्र. ३/२०१० व दुरूस्ती नियम क्र. १/२०१२ नुसार खाली नमूद केलेल्या शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना त्यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ठ सेवेबद्दल व योगदानाबद्दल दि. १ मे, २०१८ रोजी उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत.

**अ) विद्यापीठ स्तर -**

| | | |
|---|---|---|
| (अ) | **शिक्षक** | :- डॉ. गजानन घनश्याम मुळे, सहाय्यक प्राध्यापक, भौतिकशास्त्र विभाग |
| (ब) | **प्रथम श्रेणी अधिकारी** | :- निरंक |
| (क) | **द्वितीय श्रेणी अधिकारी** | :- श्री राजेश वसंतराव उपाध्ये, मालमत्ता अधिकारी, अभियांत्रिकी विभाग |
| (ड) | **तृतीय श्रेणी कर्मचारी** | :- श्री मनोहर तुकारामजी डोळस, वरिष्ठ सहाय्यक, परीक्षा विभाग |
| (इ) | **चतुर्थ श्रेणी कर्मचारी** | :- श्री भारतसिंह रघुनाथसिंह ठाकुर, शिपाई, महाविद्यालयीन विभाग |

**ब) संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था स्तर-**

| | | |
|---|---|---|
| (अ) | **संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य / संचालक** | :- डॉ.मिर सादिक अली, प्राचार्य, प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरीग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा |
| (ब) | **संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक** | :- डॉ. अर्चना देविदास बोबडे, सहयोगी प्राध्यापक, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती. |
| (क) | **संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी** | :- श्री विजय शंकरराव उपाध्ये, कनिष्ठ लिपीक,लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी. जि.यवतमाळ. |

**नाविन्यपुर्ण उपक्रम (रोख पुरस्कार रूपये ५००१/- व प्रशस्तिपत्र)** :- श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा (लाड), जि.वाशिम.

(डॉ. अजय प्र. देशमुख)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

---

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**आस्थापना विभाग**
क्र. संगाबाअवि/१/१०२/ई-१९(एच)/ /२०१८
दिनांक : मे, २०१८

**प्रत :**

उपकुलसचिव (विद्या), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सदर अधिसूचना विद्यापीठ राजपत्र भाग-२ प्रसिद्ध करण्याचे कार्यवाहीस्तव अग्रेषित.

सहपत्र : मान्य प्रारूपाची प्रत.

उपकुलसचिव (आस्था.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

E (19.1)

नियम ३/२०१० व दुरुस्तीचा नियम क्र.१/२०१२ मधील तरतुदी लक्षात घेऊन वरीलप्रमाणे प्राप्त प्रस्तावांचे समितीने अवलोकन करुन गौरव पुरुस्कारासाठी पात्र ठरलेल्या खालील व्यक्तींना दि.१ मे,२०१७ रोजी गटनिहाय पुरूस्कार प्रदान करुन त्यांना गौरवान्वित करण्यात यावे, अशी समितीने एकमताने शिफारस केली.

2096

अ) विद्यापीठ स्तर

| | |
|---|---|
| (अ) शिक्षक | डॉ.संदीप आनंदराव वाघुळे, सहाय्यक प्राध्यापक, पद्‌.भौतिकशास्त्र विभाग |
| (क) द्वितीयश्रेणी अधिकारी | श्री विजय वामनराव जोशी, अधीक्षक, भांडार विभाग |
| (ड) तृतीयश्रेणी कर्मचारी | श्री श्रीराम दिनकर ढोले, कनिष्ठ सहाय्यक, सारणी शाखा,परीक्षा विभाग |
| (इ) चतुर्थश्रेणी कर्मचारी | श्री राजेंद्र गोविंदराव डायलकर, शिपाई, विकास विभाग |

ब) संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था स्तर

| | |
|---|---|
| (अ) संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक | डॉ.उदय विनायकराव नावलेकर, प्राचार्य, आबासाहेब पारवेकर महाविद्यालय, यवतमाळ (प्रस्तावासोबत गोपनिय अहवालाच्या प्रती सादर करण्यात आलेल्या नाहीत. यासंदर्भात समितीने विचारविमर्श केला व प्राचार्य पदाकरीता गोपनिय अहवाल अपेक्षित नसल्याने व त्यांचा प्रस्ताव संस्थेने नमूद केलेले अभिप्राय व शिफारस लक्षात घेऊन समितीद्वारा विचारात घेण्यात आला.) |
| (ब) संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक | डॉ.शिरीष पंजाबराव देशमुख, प्राध्यापक व विभाग प्रमुख, रसायनशास्त्र विभाग, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला. |
| (क) संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेतर कर्मचारी | श्री नितीन वसंतराव खोब्रागडे, प्रयोगशाळा परिचर, प्राणीशास्त्र विभाग, विद्याभारती महाविद्यालय, अमरावती. |

| | |
|---|---|
| क) नाविन्यपूर्ण उपक्रम | "चक्री वाचनालय" लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी, जि.यवतमाळ |

चर्चेदरम्यान, सदर प्रयोजनार्थ अस्तित्वात असलेल्या मूळ नियम क्र.३/२०१० व दुरुस्तीचा नियम क्र.१/२०१२ मधील तरतुदीसंदर्भात विचार विनिमय करण्यात आला. चर्चेअंती सदर नियमास दुरुस्ती होणे आवश्यक असल्याचे समितीने मत व्यक्त केले व त्यानुसार सदर नियमात आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्त्या करण्याकरीता कार्यालयाने पुढील वर्षाच्या गौरव पुरस्कारासाठी तसे प्रस्तावित करावे, असा निर्णय घेण्यात आला.

उपरोक्त कार्यवृत्त आजच्या सभेत कायम करण्यात आले व आभार प्रदर्शनानंतर सभेची कार्यवाही संपली.

| | | |
|---|---|---|
| (डॉ.मुरलीधर चांदेकर) | (डॉ.डी.एन.शिंगाडे) | (डॉ.अजय प्र. देशमुख) |
| अध्यक्ष | सदस्य | सचिव |

२०१६

## अधिसूचना

क्र. २६/२०१६ दिनांक : १९ मे, २०१६

**विषय :- सन २०१६ मध्ये विद्यापीठातर्फे देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्राप्त प्राचार्य/ शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नाव जाहीर करणे**

सर्व संबंधितांच्या माहितीकरीता अधिसूचीत करण्यात येते की, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये सूरू करण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत मुळ नियम क्र. ३/२०१० (दुरूस्ती नियम क्र. १/२०१२) नुसार खाली नमूद केलेल्या शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना त्यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ठ सेवेबद्दल व योगदानाबद्दल दि. १ मे, २०१६ रोजी उत्कृष्ठ सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत.

<u>दुरूस्ती नियम क्र. १/२०१२ च्या परिच्छेद ४ अंतर्गत-</u>

अ) विद्यापीठ स्तर -

(अ) शिक्षक- डॉ. प्रशांत विनायकराव ठाकरे, सहयोगी प्राध्यापक, जैवतंत्रशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

(ब) प्रथम श्रेणी अधिकारी :- श्री दिलीप विश्वासराव वानखडे, सहाय्यक कुलसचिव, परीक्षा विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

(ड) तृतीय श्रेणी कर्मचारी :- श्री चंद्रसिंग भावसिंग धिरबस्सी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, रासायनिक तंत्रशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

(इ) चतुर्थ श्रेणी कर्मचारी :- श्री संजय महादेवराव बाळापुरे, मदतनीस, पदव्युत्तर शिक्षण विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

<u>मुळ नियम क्र. ३/२०१० च्या परिच्छेद ५) अंतर्गत-</u>

**ब) संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था स्तर** -

**(अ) संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य / संचालक :-**

डॉ. राजेंद्र आनंदराव उमेकर, प्राचार्य, श्री भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा, ता. अचलपूर, जि. अमरावती

**(ब) संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक : -**

डॉ. दिलीप व्यंकटेश अलोणे, सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी, जि. यवतमाळ

**(क) संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी : -**

श्री विनायक देविदासपंत पदमगीरवार, ग्रंथालय परिचर, श्री के. एन. गोयनका महाविद्यालय, कारंजा(लाड), जि.वाशिम

स्वा/-
(डॉ. अजय प्र. देशमुख)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

श्री देशमुख 14.9.16

*****

E19-1(G)

२०१५

दिनांक ऑक्टोबर, २०१५

अधिसूचना

क्र. / २०१४ दिनांक : ऑक्टोबर, २०१५

**विषय :- सन २०१५ मध्ये विद्यापीठातर्फे देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्राप्त प्राचार्य/ शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नावे जाहीर करणे**

सर्व संबंधितांच्या माहितीकरीता अधिसूचीत करण्यात येते की, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये सूरू करण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत मुळ नियम क्र. ३/२०१० व दुरुस्तीचा नियम क्र. १/२०१२ नुसार खाली नमूद केलेल्या शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना त्यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल व योगदानाबद्दल दि. १ मे, २०१५ रोजी उत्कृष्ठ सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत.

**दुरुस्ती नियम क्र. १/२०१२ च्या परिच्छेद ४ अंतर्गत -**

**अ) विद्यापीठ स्तर -**

| | |
|---|---|
| (अ) शिक्षक - | डॉ. राजीव श्रीधर सपकाळ, प्राध्यापक, रासायनिक तंत्रशास्त्र विभाग |
| (ब) प्रथम श्रेणी अधिकारी - | श्री प्रविण वामनराव राठोड, उपकुलसचिव(प्रशासन) |
| (क) द्वितीय श्रेणी अधिकारी - | श्री शिरीश निळकंठराव कुळकर्णी, अधीक्षक, वित्त विभाग |
| (ड) तृतीय श्रेणी कर्मचारी - | श्री राजु मधुकरराव शेंडे, सहा. अधीक्षक, गोपनीय विभाग |
| (इ) चतुर्थ श्रेणी कर्मचारी - | सौ. अर्चना अविनाशराव करकडे, प्रयोगशाळा परिचर, पदव्युत्तर गृहविज्ञान विभाग |

**मुळ नियम क्र. ३/२०१० च्या परिच्छेद ५) अंतर्गत -**

**ब) संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था स्तर -**

| | |
|---|---|
| (अ) संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक - | डॉ. नंदकिशोर शामराव ठाकरे, प्राचार्य, मातोश्री सुभद्राबाई पाटील कला, विज्ञान व कै. पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय, मानोरा, जि. वाशिम |
| (ब) संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक - | डॉ. गजानन निरंजनराव चौधरी, प्राध्यापक, रसायनशास्त्र विभाग, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती |
| (क) संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरातील - शिक्षकेतर कर्मचारी | सौ. नलिनी प्रभाकरराव वंदे, प्रयोगशाळा परिचर, मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती |

(डॉ. अ. प्र. देशमुख)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

---

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**आस्थापना विभाग**
क्र. संगाबाअवि/१/१०२/ई-१९(१)(जी)/9-9094/२०१५
दिनांक : 6 ऑक्टोबर, २०१५

उपरोक्त अधिसूचना विद्यापीठ राजपत्र भाग-२ मध्ये प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

उपकुलसचिव(आस्था)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

उपकुलसचिव(विद्या)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## 4.Announcement in the Newsletter / website

**University website links**

1. **https://www.sgbau.ac.in/pages/Awards.aspx**
2. **https://www.sgbau.ac.in/pages/Awards/Gaurav%202021Letter%20with%20enclosure.pdf**



The Hitavada
NAGPUR ■ Sunday ■ April 30 ■ 2017

# SGAU announces Utkrushta Seva Gaurav Awards

■ Amravati Bureau
AMRAVATI, Apr 29

SANT Gadgebaba Amravati University has made an announcement of winners of Utkrushta Seva Gaurav Award presented to officers, teachers and employees to mark its foundation day and Maharashtra Din on May 1.


From University category the award under teachers category has been declared to Dr Sandip Waghule, Associate Professor from Post Graduate Department of Physics. The award from Class II officers' category has been declared to Vijay Joshi, Superintendent from Warehouse Department while award from Class III employees has been declared to Shriram Dhole, Junior Assistant from Tabulation Department of Examination Department while award from Class IV employees' catergory has been declared to Rajendra Dayalkar, peon from Development Department of SGAU.

The award from Principal or Director category has been declared to Dr Uday Nawalekar, Principal from Babasaheb Parvekar Mahavidyalaya, Yavatmal. From teachers category under affiliated colleges the award has been declared to Shirish Deshmukh, Head of Chemistry Department, Shivaji Arts, Commerce and Science College, Akola. The award from non-teaching employees has been declared to Nitin Khobragade, Labortory Attendant from Vidyabharti Mahavidyalaya, Amravati. Also, the award under innovative project has been declared to Chakri Wachnalaya of Lokmanya Tilak Mahavidyalaya, Wani in Yavatmal district.

The awards will be presented at the hands of Dr Murlidhar Chandekar, Vice-Chancellor of Sant Gadgebaba Amravati University on May 1. Dr Ajay Deshmukh, Registrar of SGAU, and Dr F C Raghuvanshi, Principal of Vidyabharti Mahavidyalaya, Amravati and also the Dean of Science Stream of SGAU, have been invited to present the awards.

# विद्यापीठाचे उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार जाहीर

## कुलगुरुंच्या हस्ते १ मे रोजी होणार प्रदान




अमरावती दि. २७ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने विद्यापीठ स्थापन दिन व महाराष्ट्र दिन १ मे रोजी दिला जाणारा उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. विद्यापीठ स्तर गटांतर्गत शिक्षक संवर्गात विद्यापीठाच्या पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. संदीप आनंदराव वाघुळे, व्दितीय श्रेणी अधिकारी संवर्गात भांडार विभागात अधीक्षक पदावर कार्यरत श्री विजय वामनराव जोशी, तृतीय श्रेणी कर्मचारी संवर्गात परीक्षा विभागांतर्गत सारणी शाखेतील कनिष्ठ सहायक श्री श्रीराम दिनकर ढोले आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी संवर्गात विकास विभागात शिपाई पदावर कार्यरत श्री राजेंद्र गोविंदराव डायलकर यांची उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारास निवड झाली आहे.

संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था स्तर गटात संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक संवर्गात आबासाहेब पारवेकर महाविद्यालय, यवतमाळचे प्राचार्य डॉ. उदय विनायकराव नावलेकर, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक संवर्गात श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. शिरीष पंजाबराव देशमुख तर संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी संवर्गात विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीच्या प्राणीशास्त्र विभागातील प्रयोगशाळा परिचर श्री नितीन वसंतराव खोब्रागडे यांची निवड करण्यात आली आहे. शॉल, श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र व चांदीचे पदक असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी, जिल्हा यवतमाळच्या 'चक्री वाचनालय' या उपक्रमास रोख रक्कम रुपये ५००० चा पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. १ मे रोजी कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या शुभहस्ते हे पुरस्कार विजेत्यांना ससन्मान प्रदान होतील. पुरस्कारक म्हणून विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अजय देशमुख व विद्याभारती महाविद्यालय अमरावतीचे प्राचार्य तथा विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. एफ.सी. रघुवंशी यांना आमंत्रित करण्यात आले आहे. विजेत्यांचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर व कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी अभिनंदन केले आहे.

हिंदुस्थान शुक्रवार २८ एप्रिल २०१७

# विद्यापीठाचे उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार जाहीर



## कुलगुरुंच्याहस्ते 1 मे रोजी होणार प्रदान

प्रतिनिधी / २६ एप्रिल

अमरावती : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने विद्यापीठ स्थापन दिन व महाराष्ट्र दिन 1 मे रोजी दिला जाणारा उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. विद्यापीठ स्तर गटांतर्गत शिक्षक संवर्गात विद्यापीठाच्या पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. संदीप आनंदराव वाघुळे, व्दितीय श्रेणी अधिकारी संवर्गात भांडार विभागात अधीक्षक पदावर कार्यरत श्री विजय वामनराव जोशी, तृतीय श्रेणी कर्मचारी संवर्गात परीक्षा विभागांतर्गत सारणी शाखेतील कनिष्ठ सहायक श्री श्रीराम दिनकर ढोले आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी संवर्गात विकास विभागात शिपाई पदावर कार्यरत श्री राजेंद्र गोविंदराव डायलकर यांची उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारास निवड झाली आहे.

संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था स्तर गटात संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक संवर्गात आबासाहेब पारवेकर महाविद्यालय, यवतमाळचे प्राचार्य डॉ. उदय विनायकराव नावलेकर, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक संवर्गात श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. शिरीष पंजाबराव देशमुख तर संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी संवर्गात विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीच्या प्राणीशास्त्र विभागातील प्रयोगशाळा परिचर श्री नितीन वसंतराव खोब्रागडे यांची निवड करण्यात आली आहे. शॉल, श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र व चांदीचे पदक असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी, जिल्हा यवतमाळच्या 'चक्री वाचनालय' या उपक्रमास रोख रक्कम रुपये 5000 चा पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. 1 मे रोजी कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या शुभहस्ते हे पुरस्कार विजेत्यांना ससन्मान प्रदान होतील. पुरस्कारक म्हणून विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अजय देशमुख व विद्याभारती महाविद्यालय अमरावतीचे प्राचार्य तथा विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. एफ.सी. रघुवंशी यांना आमंत्रित करण्यात आले आहे. विजेत्यांचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर व कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी अभिनंदन केले आहे.

वृत्त केसरी गुरुवार, 27 एप्रिल 2017